महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास तथा भूविकास बँकेतील कर्मचारी यांना मागील २ ते ३ वर्षांचे वेतन मिळण्याबाबत

(१) ९६३ (२२-१२-२०१४). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास तथा भूविकास बँकेतील कर्मचारी यांना मागील २ ते ३ वर्षापासून वेतन मिळाले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन लवकरात लवकर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२०-०८-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास तथा भूविकास बँकांबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असून त्यानुसार दि. २४.०७.२०१५ व दि. ०३.०८.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सदर निर्णयानुसार भूविकास बँकांतील कर्मचाऱ्यांचे वेतन कर्जाच्या वसुलीतून तसेच बँकेच्या मालमत्ता विक्रीतून अदा करावयाचे आहे. बँकेच्या मालमत्ता विक्री करुन कर्मचाऱ्यांची देणी अदा करण्याची कार्यवाही संबंधीत अवसायकांमार्फत चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक (जि.नागपूर) येथील भोजापूर उपसा सिंचन योजनेअंतर्गत बाधीत शेतकऱ्यांचे थकीत कर्ज माफ करण्याबाबत

(२) ४००२ (२३-१२-२०१४). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील भोजापूर उपसा सिंचन योजना अपूर्ण स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन योजनेत अधिग्रहित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वर थकीत पैसे नमुद केलेले असून त्यामुळे त्यांना शासन कर्ज मंजूर करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांवर असलेले थकीत कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. सुभाष देशमुख (२०-०८-२०१८) : (१) व (२) होय.

(३) सदर संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांवरील थकीत कर्ज माफ करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन कोणतीही कार्यवाही सुरु नाही.

तथापि संस्थेच्या २२ सभासद शेतकऱ्यांनी भुविकास बँकेसाठीच्या एक रकमी कर्ज परतफेड योजनेंतर्गत एकूण रु. ५४.२३ लाख (व्याजासह) इतक्या रक्कमेच्या कर्जाची परतफेड केली असून संबंधितांच्या एकूण १२७ एकर जमीनीवरील कर्जाचा बोजा कमी करण्यात आला आहे.

राज्यात तापी खो-यातील शेतक-यांनी स्थापन केलेल्या जलसिंचन योजनांना कर्ज माफी देण्याबाबत

(३) ६१६३ (२३-१२-२०१४). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तापी खो-यातील शेतक-यांनी स्थापन केलेल्या जलसिंचन योजनांना शासनामार्फत कर्ज माफी देण्यात आली असून राज्यातील इतर उपसा जलसिंचन योजनांना कर्जमाफी न दिल्याने भू-विकास बँकाकडून कर्ज वसूली करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तापी खो-यातील जलसिंचन योजनाप्रमाणे राज्यातील इतर जलसिंचन योजनांना कर्जमाफी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१८-०८-२०१८) : (१) होय.
(२) व (३) राज्यातील इतर उपसा जलसिंचन योजनांच्या कर्जमाफीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २२.३.२०१३ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार उपसा सिंचन संस्थांना कर्ज देणाऱ्या बँकांनी त्यांचे स्तरावर संचालक मंडळाच्या मान्यतेने एक रकमी कर्ज परतफेड योजना लागू करुन त्यानुसार संबंधीत उपसा सिंचन संस्थांनी त्यांच्या एकूण देयबाकी कर्जापैकी मुद्दलाची रक्कम बँकांकडे परतफेड केल्यास अशा कर्जावरील व्याजात सूट देण्याबाबतचा निर्णय संबंधीत बँकांनी त्यांचे स्तरावरुन घ्यावयाचा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीच्या लाखो रुपयांच्या अखर्चित निधीबाबत

(४) ४१८५९ (२८-०४-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीचा ८९ लाख रुपयांचा निधी शिल्लक असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरप्रकरणी संबंधितांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, संबंधित निधी अखर्चित असल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, आतापर्यंत सदरहू निधी खर्च करण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) : (१) होय.
(२) नाही
(३) व (४) सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेला निधी सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये खर्च करुन १०७२३ विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

राज्यात मेट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विदयार्थी व महाविद्यालयांना दिल्या जाणा-या शिष्यवृत्ती दरम्यान येत असलेल्य अनेक अडचणी

(५) ४२६६३ (२८-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाविद्यालयातील विविध प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या भारत सरकार मेट्रिकेत्तर स्कॉलरशिप योजनेत गेल्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी व महाविद्यालय यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थी व महाविद्यालयांना विहीत मुदतीत फॉर्म भरता आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्कॉलरशिपचे फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) : (१) नाही.
(२) नाही.
(३) सन २०१५-२०१६ या वर्षासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दिनांक ३१.०३.२०१६ पर्यंत देण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विद्युत क्षेत्रातील नव्या अधिनियनानुसार खासगी विजनिर्मितीच्या कंपन्यांनाही राज्यात मुक्त प्रवेश लागू करण्याबाबत

(६) ४२८१६ (२८-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्युत क्षेत्रातील नव्या अधिनियनानुसार खासगी विजनिर्मितीच्या कंपन्यांनाही राज्यात मुक्त प्रवेश लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वीज कंपन्यांनी औद्योगिक कंपन्यांना ५ रुपये ४० पैसे प्रति युनिट या दराने वीजपुरवठा केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात महावितरणचे विजेचे दर प्रति युनिट साडेआठ रुपये आहे सदर दर इतर राज्यापेक्षा जास्त असल्याचे यापूर्वी महावितरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आले असतानाही महावितरण यांनी त्याची दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे उद्योगांनी बाहेरच्या राज्यात स्थलांतर केले असल्याने गेल्यापाच वर्षात महावितरण विजेची विक्री तब्बल अडीच हजार दशलक्ष युनिटने कमी झाली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी महावितरण प्रशासनाने त्याची दखल घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) मुक्त प्रवेश अंतर्गत वीज खरेदीदार ग्राहक व वीज विक्रेता यांचे दरम्यान वीज क्षमता व दर याबाबत द्विपक्षीय वीजपुरवठा करार करण्यात येतो
(३) वीज दर ठरविण्याचे अधिकार विद्युत अधिनियम, २००३ नुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. सदर दर ठरवितांना ग्राहक संख्या, वर्गवारी, वीज कंपन्याचा संचालन व देखभाल खर्च, वीज खरेदी दर इ. गोष्टी विचारात घेण्यात येतात
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अचलपूर व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील विद्युत कामे पूर्ण करण्याबाबत

(७) ४५०३० (२१-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील आसेगाव पूर्णा व करजभाव येथे १३२ के व्ही उपकेंद्र निर्मिती, १३२ के.व्ही. उपकेंद्र अचलपूर येथे चांदूर बाजार व अंजनगाव येथे अतिरिक्त २५ एम.व्ही. ट्रान्सफार्मर बसविणे, इन्फ्रा -२ व दिन दयाळ उपाध्याक्ष ग्राम जोती योजनेंतर्गत तालुका अचलपूर व चांदूरबाजार येथील हरम, मैथनाथपूर, कविठा, बेलोरा ब्राम्हणवाडा पाठक लखन पाडी येथे ३३ के.व्ही उपकेंद्र निर्मितीबाबत आणि चांदूर बाजार शहराकरिता अतिरिक्त ३३ के.व्ही. उपकेंद्र निर्मिती आदि मागण्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ नोव्हेंबर २०१५ रोजी आयोजित केलेला भाला पुराणी मोर्चा व दिनांक २६ मार्च २०१३ ते १४ जुलै, २०१५ या कालावधीत सलग ३ वर्षे संबंधित अधिकारी यांचेकडे लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. पालकमंत्री अमरावती यांनी याबाबत मा. ऊर्जा मंत्री निर्णय घेतील असे लेखी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीत विद्युत विषयक कामे प्रलंबित ठेवल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने उक्त सर्व ठिकाणी उपकेंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-१०-२०२४) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) आसेगाव पूर्णा किंवा करजगाव येथे १३२/३३ के.व्ही.उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव राज्य पारेषण उपक्रमाच्या आराखडयात सन २०२१-२२ मध्ये कार्यान्वित करण्यासाठी समाविष्ट करण्यात आला आहे.

१३२ के.व्ही.अचलपूर उपकेंद्रात २५ एम.व्ही.ए., १३२/३३ के.व्ही. चे एक अतिरिक्त रोहित्र दिनांक २१.०६.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

१३२ के.व्ही. चांदूरबाजार उपकेंद्रात सद्यस्थितीत १३२ के.व्ही चांदूरबाजार उपकेंद्रातील सरासरी भार (७७%) पाहता अतिरिक्त रोहित्राची आवश्यकता दिसून येत नाही

१३२ के.व्ही. अंजनगाव उपकेंद्राचा सरासरी भार (७०%) व या उपकेंद्राजवळच २२० के.व्ही अंजनगाव उपकेंद्र असल्याने १३२ के.व्ही.अंजनगाव येथे अतिरिक्त रोहित्राची आवश्यकता दिसून येत नाही.

हरम व मेघनाथपूर येथे नवीन ३३ के.व्ही उपकेंद्रे इन्फ्रा-२ या योजनेंतर्गत प्रस्तावित असून सदरील उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. ब्राम्हणवाडा पाठक व लाखनवाडी शहर येथे नवीन ३३ के.व्ही. उपकेंद्रे पं. दिनदयाळ ग्रामज्योती योजनेअंतर्गत प्रस्तावित असून सदरील उपकेंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच चांदूर बाजार हे उपकेंद्र आय.पी.डी.एस.योजनेअंतर्गत प्रस्तावित असून सदरील उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच कविठा हे गाव लाखनवाडी गावाजवळच असल्यामुळे सदर गावामध्ये नवीन उपकेंद्र तांत्रिकदृष्टया शक्य होत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

तुड्ये (ता.चंदनगड, जि.कोल्हापूर) येथील वीज वितरण कंपनीचे सबस्टेशन बंद असल्याबाबत

(८) ४५३८५ (२८-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुड्ये (ता.चंदनगड, जि.कोल्हापूर) येथील वीज मंडळाचे सबस्टेशन मध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सबस्टेशन बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याबाबत संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

सदर उपकेंद्र खराब इन्सुलेटर्स बदलल्यानंतर दिनांक ०१.०५.२०१६ रोजी पुन्हा कार्यान्वित करण्यात आले.

(२) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) ३३/११ के.व्ही तुड्ये उपकेंद्र व संबंधित ३३ के.व्ही वाहिनी दिनांक १२.०६.२०१४ रोजी कार्यान्वित करण्यात आली होती. सदर ३३ केव्ही लाईनसाठी वापरण्यात आलेले ३३ के.व्ही डिस्क इन्सुलेटर वारंवार नादुरुस्त होत असल्याने सदर उपकेंद्र जून, २०१५ पासून बंद ठेवण्यात आले होते. ही बाब कामाचे ठेकेदार मे. ॲस्टर टेलिसर्व्हीसेस प्रा.लि., हैद्राबाद यांचे निदर्शनास आणून दिली. तथापि त्यांनी खराब डिस्क इन्सुलेटर न बदलल्यामुळे सदरचे काम त्या कंपनीच्या जोखीमवर दुसऱ्या ठेकेदारांकडून करुन घेण्यात आले. याअंतर्गत सुमारे ५०० डिस्क इन्सुलेटर बदलण्यात आले असून त्याचा अंदाजे खर्च रु.१,००,३७६/- इतका झाला. ती रक्कम वसूल करण्याची कार्यवाही गडहिंग्लज विभाग, कोल्हापूर परिमंडळ अंतर्गत येथे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यंत्रमागाची वीज बिले जुन्या दरानेच भरुन घेण्याचा घेतलेला निर्णय

(९) ४७६६५ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यंत्रमागाची वीज बिले जुन्या दरानेच भरुन घेण्याचा यंत्रमागाच्या वीजदरात कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय मा.उर्जा मंत्री यांनी घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्यात आला आहे. हे ही, खरे आहे काय,
(३) असल्यास, मंत्रीमंडळाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) : (१), (२), (३) व (४) राज्यातील ग्राहकांच्या वर्गवारीनुसार वीजदर निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या वीजदर आदेशानुसार लघुदाब यंत्रमाग ग्राहकांच्या वीजदर सवलतीकरिता महावितरण कंपनीस अनुदान देऊन २७

अश्वशक्तीच्या खालील व त्यावरील लघुदाब यंत्रमाग ग्राहकांच्या परिणामी वीजदर हा रु.२.६६ प्रति युनिट एवढा ठेवण्यात आला होता. परंतु दिनांक ०३.११.२०१६ च्या बहुवार्षिक वीजदर आदेशामध्ये झालेली वीज दरवाढ ही दिनांक ०७.११.२०१५ च्या शासन निर्णयानुसार शासन अनुदानाची मर्यादा कायम ठेवावयाची असल्याने जून, २०१५ च्या तुलनेत होणारा वीजदरातील वाढीचा भार हा यंत्रमाग ग्राहकांकडून वसूल करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील उद्योगांना अखंडित विजपुरवठा मिळण्याबाबत

(१०) ५२६५६ (२८-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योग व्यवसायांना अखंडित वीज पुरवठा मिळावा या उद्देशाने उद्योग व्यवसायांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव महावितरण वीज कंपनीच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास राज्यात माहे जानेवारी, २०१६ पासून मागेल त्याला वीज देण्याचा निर्णय महावितरण वीज कंपनीने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१६) : (१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा व्यतिरिक्त महाराष्ट्रातील एकत्रित समूहात असलेल्या व गावठाण/इतर मिश्र वाहिनींद्वारे वीज पुरवठा असलेल्या औद्योगिक ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा मिळावा याबाबत दि.१७.०८.२०१५ रोजी उद्योग विभागामार्फत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील एकत्रित समूहात असलेल्या व गावठाण/ इतर मिश्र वाहिंनीद्वारे वीज पुरवठा असलेल्या औद्योगिक ग्राहकांना अखंडीत वीजपुरवठा मिळण्याकरिता एक्सप्रेस फिडर पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्योग विभागामार्फत महावितरण कंपनीस रु.७.८६ कोटी देण्यात आले असून रु.२.१७ कोटींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त पुढाकाराने कृषी ग्राहकांव्यतिरिक्त इतर सर्व ग्राहकांना पुढील पाच वर्षात २४ X ७ अखंडित वीज उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यासाठी केंद्र शासनामार्फत मे. डिलॉईट यांची नियुक्ती करण्यात आली.

त्यानुसार सदर कंपनीने याबाबतचा आराखडा तयार करुन भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांना सादर केला आहे. महावितरणने २४ X ७ सर्वांना वीज उपलब्ध करुन देण्यासाठी रु.२८,३९४/- कोटींची गुंतवणूक सन २०१६ ते २०१९ या कालावधीत प्रस्तावित केली आहे. त्यानंतर रु. ९,६९१/- कोटी सन २०१९-२० मध्ये गुंतवणूक करण्याचे नियोजित केले आहे. ही गुंतवणूक कर्ज, भागभांडवल आणि निधी या माध्यमातून उपलब्ध करण्यात येणार आहे.

राज्यात "मागेल त्याला वीज" देण्याचे महावितरणचे धोरण असून त्यासाठी आवश्यक असणारी पायाभूत सुविधा उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) वरीलप्रमाणे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

नंदूरबार जिल्हयातील संस्थेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीत केलेला गैरव्यवहार

(११) ५६१७८ (२०-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ज्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाखापेक्षा कमी आहे त्यांना केंद्रशासनाकडून दरवर्षी रु. ३,००० कोटी शिष्यवृत्ती येत असते. नंदूरबार येथील संस्थेने मागील पाच वर्षात रु. ७८ लाख बोगस विद्यार्थ्यांच्या नावावर शिष्यवृत्ती घेतली असून उस्मानाबाद येथील १७ व्यावसायिक संस्थांनी रु. २.२ कोटी बोगस विद्यार्थ्यांची नावे सादर करुन शिष्यवृत्तीत गैरव्यवहार केला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती घेणा-या राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थाची तपासणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर प्रकरणी गैरव्यवहार करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(५) नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२९-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

अनुसूचित जातीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासनाकडून सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ या कालावधीत एकूण रु.१३२८.५६ कोटी इतका निधी प्राप्त झाला.

दिनांक १ जानेवारी २०१० ते ३१ मार्च २०१६ या कालावधीत भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण फी परीक्षा फी योजनेंतर्गत झालेल्या अनियमिततेची विशेष चौकशी पथकाने चौकश केली असून, त्यामध्ये नंदुरबार व उस्मानाबाद येथील शैक्षणिक संस्थाचा समावेश आहे.

(२) नाही, विशेष चौकशी पथकामार्फत एकूण १७०४ शैक्षणिक संस्थांची तपासणी करण्यात आली.

(३), (४) व (५) विशेष चौकशी पथकाच्या लेखा परीक्षण अहवालातील बाबी, निष्कर्ष व आकडेवारीची जिल्हा कार्यालयातील अभिलेख्यांशी पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

राज्यात दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी शेतक-यांना कर्जमाफी देण्याबाबत

(१२) ५७८४७ (१५-०५-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पूर्ण पीक कर्जमाफी देता येऊ शकते काय अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर येथील खंडपीठाने शासनाला केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शासनाला कर्जमाफी देता येत असल्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२७-०८-२०१८) : (१) होय.

(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील खरीप तसेच रब्बी हंगामातील ज्या गावांची पैसेवारी ५० पेक्षा कमी घोषित करण्यात आलेली आहे. अशा गावांतील शेतकऱ्यांकडील शेतीशी निगडीत कर्ज वसुलीस शासनाने स्थगिती दिली असून या हंगामातील पीककर्जाचे ५ वर्ष मुदतीच्या मध्यम मुदत कर्जामध्ये पुनर्गठन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिनांक २८/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७, या अंतर्गत कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला असून या योजनेची अंमलबजावणी चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील ग्रामीण विभागात विद्युत सहाय्यक पदावर अपंग उमेदवाराची नियुक्ती केल्याबाबत

(१३) ६२२८४ (१८-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या अकोला जिल्ह्यातील अकोला ग्रामीण विभागात विद्युत सहाय्यक पदावर अपंग उमेदवाराची नियुक्ती झाली होती परंतु, वैद्यकीय मंडळ अकोला यांनी या

उमेदवाराची शारीरिक क्षमता तपासणी न करता अपंगत्वाची तपासणी करुन ४० टक्क्यांच्या आत असलेले अपंग प्रमाणात देण्यात आल्याने त्यांच्यावर अन्याय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटना मुंबई जिल्हा शाखा अकोल्याचे अध्यक्ष यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने अंपग उमेदवाराची नियुक्त करुन दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०८-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) शासकीय वैद्यकीय मंडळ, अकोला यांनी उमेदवारास प्रथम अपंगत्व ४०% पेक्षा कमी असल्यामुळे, अपंग प्रवर्गात मोडत नाही, असे प्रमाणपत्र दिले होते.

त्यानंतर त्यांनी सहपत्र सदर अहवाल रद्द करुन जिल्हा शल्य चिकित्सक,सर्वोपचार रुग्णालय अकोला यांच्याकडून यांनी सदर उमेदवार संबंधित पदावर काम करण्यास पात्र आहे किंवा नाही याबाबत अहवाल प्राप्त करुन घ्यावा, असे कळविले. जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांनी उमेदवार फिट असल्याचे प्रमाणपत्र दिल्यामुळे, संबंधीत उमेदवारास महावितरण कंपनीने रुजू करुन घेतले.

सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही झाल्याने महावितरण कंपनीने कोणत्याही कर्मचारी/अधिकारी यांच्यावर कारवाई केलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसई रोड, आनंदनगर येथे ट्रान्सफॉर्मरच्या स्फोटातील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत

(१४) ६४१०३ (१८-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई रोड, आनंदनगर येथे ट्रान्सफॉर्मरच्या झालेल्या स्फोटातील मृतांच्या वारसांना मा. ऊर्जामंत्री यांनी जाहीर केलेली ३ लाख रूपयाची अतिरिक्त आर्थिक मदत व जखमीच्या औषधोपचारासाठी रुग्णालयाचा झालेला सर्व खर्च देण्याचे सभागृहामध्ये जाहीर करूनही अद्यापी त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीने या मदतीच्या अतिरिक्त रकमेची शासनाकडे मागणी करून देखील मंजूर करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी उर्वरित रक्कम संबंधिताना अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन पत्र दिनांक २१ मे, २०१८ च्या पत्रान्वये "संबंधितांच्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करिता येणारा खर्च महावितरण कंपनीमार्फत करण्यात यावा" असे महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महावितरण विज कंपन्यांच्या परिमंडलामध्ये
नवीन वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

(१५) ६७५०९ (२७-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरण विज कंपन्यांच्या १६ ही परिमंडलामध्ये सुमारे २ लाख नवीन वीज जोडण्या प्रलंबित असल्याचे दिनांक १७ जून २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कल्याण परिमंडलात सर्वात अधिक २६ हजार वीज जोडण्या थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील जवळपास सर्वच परिमंडलामध्ये पायाभूत सुविधा (वीज वाहिन्या, खांब, रोहित्रे, रोहित्रांची कार्यक्षमता, इ.) अपुऱ्या असल्यामुळे विज जोडण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) कल्याण परिमंडळात दि.३१ मार्च, २०१८ अखेर एकूण १५०६ कृषीपंप ग्राहक पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित आहेत. राज्यात मार्च, २०१८ अखेरपैसे भरुन प्रलंबित राहणाऱ्या संभाव्य २,२४,७८५ कृषिपंप ग्राहकांना उच्चदाब प्रणाली (HVDS) द्वारे वीज पुरवठा करण्यासाठी लागणारा रु. ५०४८.१३ कोटींचा प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली आहे.

तसेच पायाभूत आराखडा-२ प.दिनदयाळ ग्राम ज्योती योजना, एकात्मिक ऊर्जा विकास योजना, सौभाग्य योजना व जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पायाभूत सुविधा उभारणे व घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांना वीज जोडण्या देणे इ. कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रिसोड (जि.वाशिम) तालुक्यात महावितरण कंपनीच्या कारभारामुळे शेतकरी त्रस्त असल्याबाबत

(१६) ६८२८७ (२७-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यात महावितरण कंपनीच्या कारभारामुळे शेकडो शेतकरी त्रस्त झाले असून तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी गेल्या कित्येक वर्षापासून पैसे भरूनही पंपाला विद्युत जोडण्या देण्यात आल्या नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने आढावा घेवून येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी कृषीपंपाला विजजोडण्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

मार्च, २०१६ अखेर रिसोड तालुक्यातील ११७९ कृषीपंप वीजजोडणी करिता प्रलंबित होते.

(२) रिसोड तालुक्यात मार्च, २०१६ अखेर ११७९ कृषीपंप उर्जीकरण प्रलंबित होते. एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ पर्यंत ३६७ कृषीपंपाचे विद्युतीकरण करण्यात आले. मार्च, २०१७ अखेर रिसोड तालुक्यात १४३९ कृषीपंप वीजजोडणी करिता प्रलंबित होते. एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ दरम्यान ४२८ कृषीपंपाचे विद्युतीकरण करण्यात आले. मे, २०१८ अखेर रिसोड तालुक्यातील १४५४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयात २५ हजार हून अधिक शेतक-यांना कृषी पंपासाठी वीज जोडणी देण्यात आली नसल्याबाबत

(१७) ७१९८३ (२७-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात सुमारे २५ हजार हून अधिक शेतक-यांना कृषी पंपासाठी लागणारी अनामत रक्कम भरुनही एकवर्षाचा काळ पूर्ण झाला तरी अदयाप विज जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या शेतक-यांना वीज जोडण्या न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर शेतक-यांना वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०८-२०१८) : (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये माहे मार्च, २०१६ अखेर १५८८ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते. सन २०१६-१७ मध्ये १५२४ वीज जोडण्या देण्यात आल्या असून मार्च, २०१७ अखेर १५७२ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते. त्यापैकी सन २०१७-१८ मध्ये ९६८ इतक्या कृषीपंपांचे उर्जीकरण करण्यात आले आहे.

(२) निधीच्या उपलब्धतेनुसार जेष्ठता यादीप्रमाणे कृषीपंपाना वीज पुरवठा करण्यात येतो.

(३) विविध योजनाअंतर्गत प्रलंबित कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात लसणाच्या वाढत्या किंमतीमुळे ग्राहक त्रस्त झाले असल्याबाबत

(१८) ७५०३८ (२१-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भाज्या, कांदे-बटाटे इत्यादींच्या किंमतीत घट झाली असून लसणाच्या वाढत्या किंमतीमुळे ग्राहक त्रस्त झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लसणाच्या दरात प्रतिकिलो ४० ते ५० रुपयाची वाढ झाली असून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) घाऊक बाजारात लसणाचा दर १३५ ते १४० रुपये प्रति किलो झाला असून किरकोळ बाजारात लसूण १६० ते २०० रुपयांपर्यंत प्रति किलो झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लसणाचे दर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०८-२०१८) : (१) अशंत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १ जानेवारी ते ३१ डिसेंबर, २०१६ या कालावधीतील लसणाचे दर रुपये ४५ ते रुपये ६० प्रति किलो प्रमाणे होते. तर सरासरी दर रुपये ६०/- प्रति किलो होते.घाऊक बाजारात लसणाचे बाजारभाव आवकेनुसार कमी/जास्त होतात. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मध्यप्रदेश, गुजरात व राजस्थान या राज्यातून लसणाची आवक होते. त्याचाही परिणाम बाजारभावावर होतो. जानेवारी, २०१७ नंतर बाजारातील लसणाची आवक वाढल्याने लसणाच्या किंमतीमध्ये घट झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे यंत्रमागधारकांची गैरसोय होत असल्याबाबत

(१९) ७५२८८ (२८-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे अंदाजे अडीच लाख पॉवरलुमधारक असून ट्रान्सफॉर्मरमध्ये ओव्हर लोड झाल्यामुळे पॉवरलुम बंद पडतात व तद्नंतर नविन ट्रान्सफॉर्मर १५ ते २० दिवसांपर्यत उपलब्ध केले जात नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध झाले तरी सन १९७२ पासूनच्या वीज तारा असल्याने त्या वारंवार नादुरुस्त होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यंत्रमागधारकांची गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे एकूण १२,४४३ यंत्रमागधारक वीज ग्राहक आहेत. माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१८ या कालावधीत एकूण ५८४ रोहित्रे अतिभारीत असल्याने नादुरुस्त झाली होती. त्यापैकी यंत्रमाग धारक वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी एकूण १७६ रोहित्रे होती. मार्च, २०१७ अखेर ५८४ नादुरुस्त रोहित्रे बदलण्यात आली. त्यामध्ये यंत्रमाग धारकांना वीज पुरवठा करण्यासाठीच्या १७६ रोहित्रांचा समावेश आहे.

(२) जुन्या झालेल्या वीज तारा बदलण्याची कामे पायाभूत आराखडा भाग-१, २ व आरएपीडीआरपी या योजनेत करण्यात आले आहेत व प्रस्तावित आय.पी. डी.एस. योजनेअंतर्गत सदरच्या कामांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

(३) मालेगांव, जि.नाशिक येथे जुन्या झालेल्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांच्या तारा बदलविण्याची कामे पायाभूत आराखडा २ व आरअेपीडीआरपी या योजनेत करण्यात आलेली आहेत. तसेच आयपीडीएस अंतर्गत ६३.३४ किमी. ११ के.व्ही.उच्चदाब वाहिनी व १३४ किमी लघुदाब वाहिनी कार्यान्वित करण्याची कामे प्रस्तावित असून प्रगतिपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिवापूर शिवारातील टिटवी-नांद्रा येथे विद्युत रोहित्राला आग लागल्याबाबत

(२०) ८१४४२ (२८-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर शिवारातील टिटवी-नांद्रा येथे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान विद्युत स्पार्किंग झाल्याने रोहित्राला आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या आगीमुळे किती वित्तहानी झाली आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.
तथापि, रोहित्रास आग लागली नसून केबलला आग लागली होती.
(२) सदरच्या आगीमुळे ग्राहकांची कोणतीही वित्तहानी झाली नाही.
(३) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, बुलढाणा कार्यालयामार्फत दिनांक २०.०१.२०१८ रोजी करण्यात आलेली आहे. सदर जळीत प्रकरणामुळे शेतीमालाचे कुठलेही आर्थिकरित्या नुकसान झाल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे संबंधितास कुठलीही नुकसान भरपाई देणे वीज वितरण कंपनीला देय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

इमारतीमध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्वाहनांना (लिप्ट) परवानगी जिल्हा स्तरावर देण्याबाबत

(२१) ८२५०६ (२८-११-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोल्हापूर शहराचा विकास दिवसेंदिवस वाढत असून त्या ठिकाणी शासनाच्या नियमानूसार नव्याने इमारतीं बांधकामाची संख्या वाढत आहे परंतू, अजूनही इमारतीमध्ये बसविण्यात येणाऱ्या उद्वाहनाची (लिप्ट) परवानगी ही मुख्य विद्यूत निरिक्षक, मुंबई यांचेकडून घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नांगरिकांचा व विकासकांचा वेळ व पैसा यांचा अपव्यय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अपव्यय टाळण्यासाठी सदरचे अधिकार स्थानिक जिल्हयाच्या ठिकाणी देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली आहे काय वा करण्यात येणार आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
दिनांक ०२.१०.२०१६ पासून मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयातर्फे उद्वाहन उभारणीस परवानगी व उद्वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती या दोन्ही सेवा, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत "ऑनलाईन प्रणालीवर कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यामुळे नागरिक व विकासक कुठूनही, अनुज्ञप्तीसाठी अर्ज करुन संबंधित परवानगी व अनुज्ञप्ती प्राप्त करु शकतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

करमाळा (जि.सालापूर) तालुक्यातील विद्युत विषयक कामांना मंजूरी मिळण्याबाबत

(२२) ८२७०२ (२८-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) उर्जा मंडळाचे नवीन विभागीय कार्यालय स्थापन करणे, मौ.रायगाव, पोपलवाडी व लव्हे येथे ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र स्थापन करणे, शेतीपंपाना मंजूरी मिळावी इत्यादी विविध मागण्यांबाबत मा.उर्जामंत्री यांच्या समवेत दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणत्या बाबींवर चर्चा झाली व त्याप्रकरणी कोणकोणते निर्णय घेण्यात आले,

(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी समवेत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) महावितरण कंपनीने सद्यस्थितीत नवीन कार्यालय निर्मितीची मानके निश्चित करण्यासाठी नव्याने प्रक्रिया सुरु केली आहे व त्याअनुषंगाने नवीन मानके प्रसृत केल्यानंतर जेऊर येथे नवीन विभागीय कार्यालय होणे प्रस्तावासंदर्भात आर्थिक दायित्वाचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेऊन उचित कार्यवाही करण्यात येईल.

सद्यस्थितीत करमाळा मतदार संघातील १२४ अतिरिक्त वितरण रोहित्रासाठी तत्वत: तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे.

जुनी लाईन बदलणे, गावठाण रोहित्रांची बॉक्स/केबल बदलणे व जुने/गंजलेले पोल बदलण्यासाठी देखभाल दुरुस्ती योजना (O&M) अंतर्गत उपलब्ध निधीमधून टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहेत.

मौजे लव्हे, ता.करमाळा येथे ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी खाजगी जागेची खरेदी दि. ०६.०७.२०१७ रोजी करण्यात आली आहे. त्यामुळे मौजे लव्हे येथे नविन उपकेंद्रासाठी पुनश्च तांत्रिक सुसाध्यतेचा अहवाल सादर करुन उपकेंद्र उभारणीसाठी निविदा प्रक्रियेस मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी महावितरणतर्फे प्रस्ताव प्रगतीपथावर आहे.

पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंपांना उच्च दाब वितरण प्रणाली (HVDS) द्वारे वीज पुरवठा करण्याच्या योजनेला शासनाने मंजुरी दिली असून निविदा प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.

राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील इंदिरा जिनिंग प्रोसिंग संस्थेतील गैरव्यवहाराबाबत

(२३) ८४६९४ (२८-०४-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील इंदिरा जिनिंग प्रोसिंग ही संस्था मागील २० वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेवर ५० लाखाचे बँकेचे कर्ज आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु संस्था बंद स्थितीत असतानाही अवसायनात काढण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त संस्था अवसायनात काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२९-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) संस्थेच्या सन २०१६-१७ च्या अंकेक्षण अहवालावरुन सदर संस्थेवर रु. २१.४९ लाख कर्ज असल्याचे दिसून येते.
(३) सदरहु संस्था दि.१७/७/२०१७ रोजी अवसायनात काढण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागाचे संकेतस्थळ बंद असल्यामुळे ओबीसी आणि अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती स्थगित असल्याबाबत

(२४) ८५२३८ (०९-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाचे संकेतस्थळ बंद असल्यामुळे ओबीसी आणि अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती स्थगित असल्याने तसेच केंद्र शासनाकडून सन २०१७-१८ करीता निधी अद्याप मिळाला नसल्याने विद्यार्थ्यांना नविन शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस त्रास होत असल्याची बाब दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संपूर्ण शिष्यवृत्ती मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, केंद्र शासनाकडून शिष्यवृत्तीचा निधी मिळणेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२३-०८-२०१८) : (१) अंशत: होय,
(२) व (३) सन २०१७-१८ पासून सर्व विभागांच्या शिष्यवृत्तीच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये महा-डिबीटी पोर्टल सुरु केले असुन त्यावर अर्ज भरताना तांत्रिक अडचणी येत असल्याची बाब निदर्शनास आली.

सन २०१७-१८ मध्ये महाडिबीटी पोर्टल पुर्णत: कार्यान्वित होवू न शकल्याने, ऑफलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना अदा केलेले लाभ वगळून, उर्वरीत विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्काची रक्कम न्यायालयाच्या निर्देशानुसार संबंधित शैक्षणिक संस्थाना अदा करण्याचा निर्णय दिनांक १७ मे,२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१७-१८ मधील शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात आले/येत आहेत.

(४) सन २०१७-१८ मध्ये भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनूसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र शासनाकडून रु.५०४.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला असुन, तो सदर प्रयोजनार्थ खर्ची पडलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यात माहे मे महिन्यामध्ये ६० मेगावॅट वीजेची टंचाई निर्माण झाल्याबाबत

(२५) ८८६६२ (०९-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ६० मेगावॅट वीजेची टंचाई निर्माण झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतक-यांच्या शेतीमालाचे नुकसान झाले असून वीजेची टंचाई दूर करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

माहे मे, २०१७ मध्ये प्रचंड उष्णतेमुळे वीजेची मागणी वाढली होती. दि.०३.०५.२०१७, दि.२४.०५.२०१७ व दि.२५.०५.२०१७ रोजी ११० के.व्ही. विश्रामबाग आष्टा ही अतिउच्चदाब वाहिनी अतिभारीत झाल्याने सदर दिवशी कृषी वाहिन्यांवर सक्तीचे भारनियमन करण्यात आले होते.

(२) सद्यस्थितीत वीजेची टंचाई नसून कृषीपंपाना दिवसा ८ तास व रात्री १० तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांचे सहकारी वीर जीवा महाला यांचे चौदावे तेरावे वंशज मोलमजुरी करत असल्याबाबत

(२६) ९०३०१ (०९-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (जि.सातारा) तालुक्यातील कमळगडाच्या पायथ्याशी असलेल्या कोंढीवली या गावात छत्रपती शिवाजी महाराजांचा विश्वासू सहकारी जीवा महाला यांचे तेरावे वंशज झोपडीमध्ये

हलाखीच्या अवस्थेत राहत असून ते मोल मजुरी करीत असल्याचे दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्मितीमध्ये सहकार्य करणाऱ्या कुटुंबातील वंशजाची वाताहत होत असून त्याच्यांकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी राज्यातील जनतेची अपेक्षा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) : (१) सातारा जिल्हयातील वाई तालुक्यात कोंढीवली बु. या गावी छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सहकारी वीर जीवा महाले यांचे १४ वे वंशज श्री. प्रकाश बाळासाहेब सपकाळ हे सध्या पक्क्या घरामध्ये राहत आहेत. त्यांच्या कुटुंबातील सदस्य शेती व मोल मजुरी करुन उदरनिर्वाह करीत आहेत.

(२) व (३) श्री.सपकाळ यांना अन्न सुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थी म्हणून पुरवठा विषयक लाभ देण्यात येतात. तसेच त्यांना सामाजिक अर्थ सहाय्य योजनेतून लाभ देण्याची कार्यवाही सत्वर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली (जि.ठाणे) येथिल वीज तंत्रज्ञाचा झालेला मृत्यु

(२७) ९०३२१ (०९-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली पश्चिम (जि.ठाणे) विभागामधील जुनी डोंबिवली परिसरामध्ये विजेच्या खांबावर दुरुस्तीसाठी चढलेल्या वायरमनच्या मृत्यूनंतर सुमारे ३ ते ४ तास मृतदेह विजेच्या तारेवर लोंबकळत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले, तसेच सदर प्रकरणी दोषी असणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, मृत्यूमुखी पडल्या सदर कर्मचाऱ्याच्या वारसदारांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनानने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग क्र.२ ठाणे यांचे कार्यालयामार्फत दि. ३१.०५.२०१७ रोजी करण्यात आली. दिनांक ३०.०५.२०१७ रोजी सुमती सदन बंगला, शास्त्रीनगर, डोंबिवली (पश्चिम) येथील लघुदाब ग्राहकाचा विद्युत पुरवठा बंद असल्याच्या तक्रार निवारणासाठी महावितरण कंपनीचे वरीष्ठ तंत्रज्ञ गेले असता सदर

ग्राहकाची सर्व्हिस वायर बदलण्यासाठी विद्युत पुरवठा खंडीत करुन मध्यमदाब उपरी तारमार्गाच्या पोलवर चढून सर्व्हिस वायर जोडत होते. सदर मध्यमदाब उपरी तारमार्गावरील लघुदाब वीजसंच मांडणीस जोडलेल्या बऱ्याच सदनिकामध्ये इन्व्हर्टर असलेले आढळून आले आहे. त्यापैकी एका अज्ञात वीजग्राहकाचे इन्व्हर्टर मधून उपरी मध्यमदाब वाहिनीत वीजप्रवाह येऊन त्याच्या प्रत्यक्ष संपर्कात आल्याने वीजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात झाला.

(३) व (४) सदर मृत कर्मचाऱ्याच्या वारसदारास महावितरण कपनीच्या नियमानुसार अंत्यविधी मदत म्हणून रु. २९०८१/- इतकी रक्कम तात्काळ रोखीने अदा करण्यात आली आहे.

कर्मचारी कल्याण निधी अंतर्गत रक्कम रु.१०,०००/- ची आर्थिक मदत मयताच्या अवलंबित पत्नीस दिनांक ०६.०७.२०१७ रोजी देण्यात आली.

Workmens compensation Act, १९२३ नुसार मयत कर्मचाऱ्याच्या वारसास तातडीची आर्थिक मदत रक्कम रु.८,१५,४००/- देण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण परिमंडळ अंतर्गत वीजग्राहकांना अवास्तव वीज देयके आकारल्याबाबत

(२८) ९०५०७ (०९-०८-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण परिमंडळांतर्गत येणाऱ्या क्षेत्रात युनिटमध्ये फेरफार करणे, मीटरची छायाचित्रे न देता खाजगी कंपनीकडून वीजग्राहकांना अवास्तव वीज देयके पाठविणे अशा प्रकारचा गैरप्रकार होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वीजग्राहकांनी विचारणा केली असता संबधित विद्युत कार्यालयाकडून प्रथम वीज देयक भरणा करा तद्नंतर तक्रार स्विकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार बोगस वाढीव युनिट दाखवून अवास्तव वीज देयके देणाऱ्या एजन्सीवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) चुकीचे मीटर वाचन घेणाऱ्या एजन्सीवर महावितरण कंपनीकडून दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरणने पुरवठा केलेल्या विजेच्या विज देयकांची
२३ हजार कोटीची थकबाकी असल्याबाबत

(२९) ९०६३८ (०९-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी पंपाची वीज खंडीत न करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे महावितरणने पुरवठा केलेल्या विजेच्या देयकांची २३ हजार कोटींची थकबाकी असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकित रकमेवर असणा-या दंडाच्या व्याजाची रक्कम माफ करण्याचा प्रस्ताव उर्जा विभागाने शासनापुढे ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर मा.उर्जा मंत्र्यांनी काय निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे, तसेच थकित रक्कम तातडीने वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कृषी ग्राहकांना थकबाकीची मूळ रक्कम सुलभ हप्त्याने भरण्याकरिता "मुख्यमंत्री कृषी संजीवनी-२०१७" दिनांक ३१.१०.२०१७ पासून सुरु करण्यात आली होती. ज्यामध्ये थकबाकीची मूळ रक्कम ५ सुलभ हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा उपलब्ध असून शेवटचा हप्ता भरण्याचा कालावधी मार्च, २०१९ पर्यंत वाढविण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळकवणे (ता.चिपळूण जि.रत्नागिरी) गावातील रिंगीवाडी, टाकीवाडी व खलिफावाडी
या तीनही वाड्यांसाठी वीज जोडणी देण्याबाबत

(३०) ९१६२० (०९-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) कळकवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) गावातील रिंगीवाडी, टाकीवाडी व खलिफावाडी या तीनही वाड्यांसाठी पाच वर्षांपूर्वी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत विद्युतीकरणासाठी निधी मंजूर होऊनही अद्याप वीज जोडणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांसाठी निधी मंजूर असतांनाही वीज जोडणी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच वीज जोडणी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) कळकवणे गावातील रिंगीवाडी, टाकीवाडी व खलिफावाडी या तीनही वाड्यांचे विद्युतीकरण यापूर्वीच झाले आहे व अर्जदारांना अनुक्रमे एप्रिल, २०१३, ऑगस्ट, २०१५ व एप्रिल, २०१७ मध्ये वीजजोडणी देण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगाव (जि.नाशिक) येथे उघड्या रोहित्रामुळे ६ जनावरांचा झालेला मृत्यू

(३१) ९२०९९ (०९-०८-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथे ६ जनावरांचा उघड्या रोहित्रामुळे मृत्यू झाल्याची घटना दिनांक १ मे २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार मृत जनावरांच्या मालकांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) सदर घटना नांदगाव तालुक्यातील मनमाड येथे दिनांक ०८.०५.२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) सदर अपघाताची चौकशी विद्युत निरिक्षक, नाशिक कार्यालयामार्फत दिनांक ११.०५.२०१७ रोजी करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी रोहित्रापासून डिस्ट्रीब्युशन बॉक्सला जाणारी लघुदाब इनकमिंग केबल उष्णतेच्या प्रभावामुळे वितळून पंक्चर झाली. त्यामुळे केबलमधील विद्युतप्रवाह डिस्ट्रीब्युशन बॉक्स, डबलपोल स्ट्रक्चर व तेथील ओल्या जमिनीत उतरला. सदर वीज संचमांडणीस कुंपण घातलेले नसल्यामुळे दिनांक ०८.०५.२०१७ रोजी सदर घटनास्थळावरुन जाणारी बेवारस ६ जनावरांचा सदर विद्युतभारीत विद्युत संचमांडणीशी संपर्क आल्यामुळे सर्व जनावरांना विद्युत धक्का बसून ते मृत पावले.

(३) सदर अपघातामध्ये पोलीस पंचनाम्यानुसार मृत पावलेली जनावरे बेवारस असल्याबाबत तसेच नुकसान भरपाईबाबत कोणीही मागणी अर्ज दाखल न केल्याने आर्थिक मदत दिलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

करंजाळ (ता.जि.हिंगोली) येथील बरड देवीकडील कृषीपंपांना वीज पुरवठा करणा-या रोहित्रांच्या दुरूस्तीबाबत

(३२) ९२५०० (०९-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजाळ (ता.हिंगोली, जि.हिंगोली) येथील बरड देवीकडील कृषीपंपांना वीज पुरवठा करणारे रोहित्र जळाले असून खांब वाकल्याने मागील तीन महिन्यांपासून येथील वीजपुरवठा बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रोहित्रांची अद्यापही दुरुस्ती झाली नसल्याने अनेक शेतक-यांच्या पिकांचे नुकसान झाले असून याबाबत वीज कंपनीच्या कर्मचा-यांनी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळालेल्या रोहित्रांची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मौजे करंजाळ, ता.हिंगोली येथली गावठाण मधील २ (६३ के.व्ही.ए.) व कृषीपंपासाठी ०७ (६-१०० के.व्ही.ए. व १-६३ के.व्ही.ए.) असे एकूण ०९ रोहित्रांपैकी माहे एप्रिल, २०१७ ते जुलै, २०१७ या कालावधीत एकही रोहित्र जळालेले आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी गावांचा वीजपुरवठा बंद असल्याबाबत

(३३) ९३९२० (०९-०८-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील उर्जेनी, गारगाव, परळी, मांगरुळ, तुसे व सरशी या अतिदुर्गम आदिवासी गावांचा वीजपुरवठा बंद असल्यामुळे नळपाणी योजनाही बंद असून तेथील नागरिकांना दुषित पाणी प्यावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात तेथील जि.प.सदस्य-पालघर यांनी वारंवार विद्युत महावितरण कंपनीला पत्रव्यवहार केला असूनही शाखा अभियंता, वीज वितरण कंपनी यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार वीज पुरवठा नियमित होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०१८) : (१) उर्जेनी, गारगांव, परळी, मांगरुळ, तुसे व सरशी ही गावे दुर्गम परिसरात मोडत असल्याने मुसळधार पाऊस, वीज प्रवण क्षेत्र व वादळ यामुळे या भागात वीज पुरवठा करणाऱ्या वाहिनीवर दि. २० जून, २०१७ पासून मोठया प्रमाणात डिस्क व पिन इन्सुलेटर खराब होऊन तसेच विविध जागी सोसाटयाच्या वादळ वाऱ्यामुळे लगतची झाडे विद्युत वाहिनीवर पडून व विद्युत खांबे पडल्यामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने वीज पुरवठा सुरळीत करण्यास विलंब झाला होता.

(२) यासंबंधी संबंधित जिल्हा परिषद सदस्य यांनी सदर गावांतील वीजपुरवठा सुरु करणेसंबंधीचे पत्र शाखा अभियंता, वाडा (ग्रामीण) यांना दिले होते, हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये वीज पुरवठा सुरळीत करण्यात विलंब झाल्याचे आढळून आले आहे. महावितरण कंपनीकडून विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित सहाय्यक अभियंता यांना रु. ३,०००/- व जनमित्र यांना रु. १,०००/- असा दंड ठोठावण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वीज ग्राहकांना स्वस्त वीज देण्याचा घेतलेला निर्णय

(३४) ९६९४४ (०१-०१-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वीज ग्राहकांना स्वस्त वीज देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये घेतला असून मात्र माहे सप्टेंबर, २०१७ अखेर वीज स्वस्त दराने ग्राहकांना दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच मुंबईतील वीज ग्राहकांना निश्चित केव्हापासून स्वस्त वीज देण्यांत येणार आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१), (२) व (३) राज्यातील वीज वितरण कंपन्यांचे वीजदर हे महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगामार्फत ठरविण्यात येतात. विद्युत नियामक आयोगाने नोव्हेंबर, २०१६ मध्ये राज्यातील सर्व वीज वितरण कंपनीचे सन २०१६-१७ ते सन २०१९-२० पर्यंतचे वीज दर ठरविले आहेत. सदरचे वीज दर हे वीज वितरण कंपन्यांना त्यांच्या ग्राहकांपर्यंत वीज पोहोचविण्यासाठी येणारा खर्च, संचलन व देखभाल खर्च, ग्राहक संख्या वर्गवारी, वीज खरेदी खर्च इत्यादींवर अवलंबून असतो.

कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांनी एलपीजी गॅस वाहिनीस विरोध दर्शविल्याबाबत

(३५) ९७४४५ (२९-१२-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातून जात असलेल्या एलपीजी वाहिनीला जांभिवली, वडप, वेणगाव येथील शेतकरी चार वर्षापासून विरोध करीत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीसह शेतकऱ्यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा सुमारात आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२४-०८-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) पाईपलाईन प्रकल्पासाठी पेट्रोलियम आणि मिनरल्स गॅस पाईप लाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ च्या कलम ६ (१) नुसार जमीन वापर हक्क संपादित झाल्यावर शेतजमीन वापर करण्यासाठी जमीनीमध्ये जाऊन कामे करण्यावर बंधन नाही. कर्जत तालुक्यातील एकूण १६ गावामधून पाईपलाईन जात असून त्यापैकी ८ गावाचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच खालापूर तालुक्यातील ८ ही गावामध्ये पाईपलाईनचे काम पूर्ण झालेले आहे. मात्र पनवेल, पेण, उरण येथील दुष्मी (पेण) कळंबसुरे (उरण) यागावी स्थानिकांचा विरोध असल्यामुळे काम अपूर्ण आहे. बहुतेक ठिकाणी कामे पुर्ण झाली आहेत. कर्जत तालुक्यातील वदप, जांभिवली, गौरकामत या गावामधील शेतकऱ्यांनी पाईपलाईनच्या मार्गास विरोध दर्शविलेला असून वन खात्याच्या अथवा पर्यायी मार्गाने पाईपलाईन टाकणेची मागणी आहे. पेट्रोलियम आणि मिनरल्स गॅस पाईप लाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ च्या कलम ६ (१) ची अधिसूचना अंतिम असून पाईपलाईनचा मार्ग बदलणे शक्य नसल्याचे वेळोवेळी संबंधिताना प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. रायगड जिल्हयातील पाईपलाईनचे काम अंतिम टप्यात असून कर्जत तालुक्यातील उपरोक्त दोन्ही गावांच्या दोन्ही बाजुने पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असल्याने पाईलाईनचा मार्ग बदलणे शक्य होणार नाही. पाईपलाईनसाठी जमीन संपादित झाल्यावर जमीनीमध्ये शेती करण्यावर बंधन नाही. तथापि त्या जमीनीमध्ये बांधकामे, झाडे व विहिर खोदणे यावर बंधने आहेत. उरण-चाकण-शिक्रापूर गॅस पाईपलाईन हा प्रकल्प केंद्र शासनाचा असून IOCL, BPCL, HPCL यांच्या संयुक्त मालकीचा असून या प्रकल्पामुळे एल.पी.जी. गॅस पाईपलाईनद्वारे पुणे जिल्हयातील कंपनीच्या भराई यंत्रणेला जाणार असून यामुळे रस्त्यावर रोजची सुमारे ५०० एल.पी.जी टँकरची अवजड वाहतूक कमी होणार आहे. या प्रकल्पाचा आढावा पंतप्रधान कार्यालयामार्फत तसेच मुख्य सचिव (PMG) यांचे मार्फत नियमितपणे घेतला जातो. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/०२/२०१८ रोजी व जिल्हाधिकारी

रायगड यांचे स्तरावर दिनांक ३०/११/२०१७ रोजी हितसंबंधिताच्या अडी अडीचणीबाबत संबंधित भूसंपादन संस्था व सक्षम प्राधिकारी यांच्याशी बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

खामगाव (जि.बुलढाणा) येथील एमआयडीसीतील ७० टक्के बंद असल्याने ऑईल मिल अडचणीत सापडल्याबाबत

(३६) ९८२१९ (२९-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलढाणा) एमआयडीसीतील सरकीची आवक नसल्याने ७० टक्के ऑईल मिल बंद असून ऑईल मिल अडचणीत सापडल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे मजूरांना रोजगारापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२४-०८-२०१८) : (१) हे खरे नाही. ऑईल मिल हा उद्योग हंगामी स्वरुपाचा आहे. जुलै ते ऑगस्ट या कालावधीत ब्रॅन्डेड ढेप व ऑईल चे उत्पादन करणारे उद्योग वगळता ऑईल मिल बंद असतात. ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्यांमध्ये ऑईल मिल त्यांच्या उत्पादन क्षमतेच्या २०% ते ३०% उत्पादन घेतात. ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये उत्पादन केव्हा चालू करावयाचे याचा निर्णय सरकीची आवक, सरकीचे भाव, ढेप बाजारातील तेजी/मंदी यांचा विचार करुन घेतला जातो. जानेवारी ते मार्च या महिन्यांमध्ये सरकी मोठया प्रमाणावर ऑईल मिल उद्योगांना उपलब्ध होत असल्याने, जानेवारी ते जून या कालावधीत पूर्ण क्षमतेने ऑईल मिल मध्ये उत्पादन घेतले जाते.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील एमआयडीसी मध्ये एकूण ७१ ऑईल मिल असून, माहे ऑक्टोबर, २०१७ च्या सुमारास ६६ ऑईल मिल चालू होत्या. उर्वरित ५ ऑईल मिल मागील बऱ्याच वर्षापासून बंद अवस्थेत आहेत.

ऑक्टोबर, २०१७ च्या सुमारास खामगांव (जि.बुलढाणा) येथील एमआयडीसीतील ऑईल मिल सरकीची आवक नसल्याने बंद पडलेल्या नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सिरोंचा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील डिजिटल झालेल्या अनेक शाळांमध्ये विद्युत पुरवठयाचा अभाव असल्याबाबत

(३७) ९८४८१ (२९-१२-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरोंचा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील डिजिटल झालेल्या अनेक शाळांमध्ये विद्युत पुरवठयाचा अभाव असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४३ जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्युत पुरवठाच नसल्याने विद्युत पुरवठयाअभावी साहित्य विनावापर पडून असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुसार यास जबाबदार असणा-यां विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) व (२) गडचिरोली जिल्ह्यामधील सिरोंचा तालुक्यामध्ये एकूण ९४ डिजीटल शाळा आहेत. त्यापैकी ५१ डिजीटल शाळांमध्ये वीज पुरवठा सुरु आहे. उर्वरित ४३ शाळांपैकी वीज बिलाच्या थकबाकीमुळे १० शाळांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्यात आलेला आहे. सदर १० शाळांनी थकबाकीची रक्कम भरल्यास त्यांचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात येईल.

तसेच ३३ शाळांनी वीज पुरवठयासाठी महावितरणकडे अर्ज सादर केलेला नाही. परंतु जर सदर शाळांनी महावितरणच्या A-१ फॉर्म व इतर कागदपत्रांची पूर्तता करुन आवश्यक त्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर त्यांना विद्युत पुरवठा जोडणी देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करण्याबाबत

(३८) ९९९७८ (२९-१२-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करुन पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निर्मिती करण्याबाबत पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त मागणीसंदर्भात दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पालघर जिल्ह्यातील गावपाड्यातील शेतकरी व आदिवासींनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ठाणे जि.म.स. बँकेचे विभाजन होण्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कोकण विभाग नवी मुंबई यांनी दिनांक ०१.११.२०१७ व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांनी दिनांक १६.११.२०१७ रोजी बँक विभाजनाचा प्रस्ताव दाखल करण्याबाबतच्या बँकेस सुचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने बँकेने दि.२४.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये बँकेच्या विभाजन कामास अवधी लागणार असून सनदी लेखापाल यांचेकडून दोन्ही बँकांच्या आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विभाजनाचा प्रस्ताव सादर करण्यात येईल असे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब (जि.यवतमाळ) येथील नळ पाणी योजने करीता लावण्यात आलेल्या स्पेशल फिडरच्या कामाबाबत

(३९) १००५५५ (२९-१२-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब (जि.यवतमाळ) येथील नळ पाणी योजनेसाठी वर्धा नदीच्या तिरावर ११ कि.मी. अंतरावर विहीरी वर स्पेशल फिडर बसविण्यात आले असून सबस्टेशन पासुन शिरपुर पर्यंत फिडरचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, १५ कि.मी. पर्यंत विद्युतपोल नेले असता त्यावरील डिक्स इन्सुलेटर निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आले असून पोल जमीनीत उभे केले त्यावेळी सिमेंट क्रॉंक्रीटीकरण केले नसल्यामुळे पोल तारांसहीत वाकले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाची शासनाने चौकशी केली आहे त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार विभागाचे अधिकारी व कंत्राटदार दोषी आढळल्यास त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) उपरोक्त फिडरचे काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक २७.०४.२०१७ रोजी पूर्ण केलेल्या कामाची पाहणी उपकार्यकारी अभियंता, कळंब आणि संबंधित कार्यक्षेत्राचे सहायक अभियंता, कळंब ग्रामीण वितरण केंद्र यांनी केले असता त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या. संबधित कामातील त्रुटींची कंत्राटदाराने दुरुस्ती केल्यानंतर सदर वीज वाहिनी दिनांक ०२.०५.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे.

तसेच माहे जून, २०१७ मध्ये पावसाचे कालावधीत सदर परिसरामध्ये वीज पडल्यामुळे वाहिनीवरील पिन इन्सुलेटर नादुरुस्त होऊन सदर वीज वाहिनीचा वीज पुरवठा खंडित झालेला होता. तद्नंतर नादुरुस्त पिन इन्सुलेटर संबंधित कंत्राटदाराने बदलून दिले व वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. त्याचप्रमाणे अज्ञात इसमाने पोलचे स्टे वायर कापल्यामुळे काही पोल वाकले होते. त्याअनुषंगाने सदर कामाची दुरुस्ती संबंधित कंत्राटदाराकडून तात्काळ करुन घेण्यात आली आहे. सद्यस्थितीत गलमगाव एक्सप्रेस फिडर वरील वीज पुरवठा सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सदोष वीज मीटर त्वरीत बदलण्याबाबत

(४०) १००९२५ (२९-१२-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कंपनीने बसविलेले मीटर सदोष असून यासाठी नियुक्त केलेल्या रोलॅक्स मीटर्स प्रा.लि.कंपनीची निवड करताना कोणत्या अटी, शर्थ व निकष ठरविण्यात आले होते, तसेच सदोष मिटर बसविण्यासाठी एकूण किती व कोणत्या कंपनीच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी कोणत्या कंपनीची कमीतकमी व जास्तीत जास्त दराची निविदा प्राप्त झाल्या होत्या,

(२) असल्यास, रोलेक्स मीटर प्रा.लि.कंपनी न्यायालयात केव्हा गेली आहे,तसेच रोलेक्स मीटर्स कंपनीने पुरवठा केलेल्या ३,०२,३३० मीटर्स पैकी २,९२,३७५ मीटर्स बदलण्यात आलेले आहेत हे लक्षात घेता उर्वरित ९२५५ मीटर्स अद्याप बदलण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच सदर सदोष मीटर्स बदलण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) निविदा क्र.एसपी/टी-१००७/११११-सिंगल फेज आर एफ मीटरसाठी सन २०११ मध्ये महावितरण कंपनीमार्फत काढलेल्या निविदेसाठी असणारे प्राथमिक अर्हता निकष खालीलप्रमाणे आहेत :-

(अ) निविदाकार/उत्पादक यांची मागील ३ वर्षापैकी किमान १ वर्षाची आर्थिक उलाढाल ही रु. ३०.०० कोटी असली पाहिजे.

(ब) निविदाकाराने/उत्पादकाने मागील ३ आर्थिक वर्षात ५ लाख स्टॅटीक मीटर्सचा पुरवठा केलेला असला पाहिजे. त्यापैकी २ लाख मीटर्सचा पुरवठा निविदाकाराने/उत्पादकाने मागील आर्थिक वर्षात केलेला असला पाहिजे.

(क) निविदाकार/उत्पादक यांना स्टॅटीक मीटर्स पुरवठा उत्पादन करण्याचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव मागील आर्थिक वर्षापर्यंत असला पाहिजे.

जे निविदाकार वरीलप्रमाणे प्राथमिक अर्हता निकषात पात्र ठरतात अशा निविदाकारांचे निविदेसोबत आलेले नमुदा मीटर्स सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगीने तपासणीसाठी दोन वेगवेगळया शासनमान्य संस्थांकडे (NABL प्रयोगशाळेत) पाठविले जातात. तसेच नमुना मीटर्स महावितरणच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात Interoperabilily तपासणीसाठी पाठविले जातात.

ज्या निविदाकारांचे निविदेसोबत आलेले नमुना मीटर्स कोणत्याही एका शासनमान्य संस्थेकडे (NABL प्रयोगशाळेत) तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागात घेतलेल्या चाचणीमध्ये पास होतात व वाणिज्यिकदृष्ट्या पात्र ठरतात अशा निविदाकारांचे दरपत्रक उघडले जाते. या दरपत्रकानुसार ज्या निविदाकारांचे दर हे लघुत्तम (L-१) व या दरासोबत मीटर्स पुरवठा करण्यासाठी तयार असलेल्या निविदाकारांच्या निविदा पुरवठा आदेश देण्यासाठी पात्र ठरविल्या जातात. या निविदेमध्ये खालीलप्रमाणे ९ निविदाकारांनी निविदा भरली होती.

१) मे.दिल्ली कंट्रोल डिव्हाइसेस प्रा.लि., नोएडा, २) मे. फ्लॅश इलेक्ट्रानिक्स (इंडिया) प्रा.लि., फरीदाबाद, ३) मे. जिनस पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर लि., हरिद्वार, ४) मे.हिमाचल एनर्जी प्रा.लि., जबली ५) मे.एचपीएल इलेक्ट्रीक आणि पॉवर प्रा.लि., गुडगांव ६) मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लि., म्हैसूर ७)मे. पालमोहन इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि., नवी दिल्ली ८) मे.रोलेक्स मीटर्स प्रा.लि., हैद्राबाद ९ मे. युनाईटेड इलेक्ट्रिकल्स इंडस्ट्रिज, कोलम

वरीलपैकी ९ निविदाकारांच्या निविदांमधून सहा निविदाकारांच्या निविदा निविदेच्या निकषात पात्र ठरल्या. यापैकी मे. रोलेक्स यांचे दर रु. १३२२.८२ लघुत्तम (L-१) आढळले. तसेच मे. पालमोहन इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचे दर जास्तीत जास्त म्हणजे रु.१४७२.०२ इतके प्राप्त झाले होते.

(२) व (३) मे.रोलेक्स मीटर्स प्रा.लि. कंपनी यांनी शहर दिवाणी न्यायालय सिकंदराबाबत येथे माहे मे, २०१६ मध्ये महावितरणकडून बँक हमी रोखीकरण न होण्यासाठी अपील सादर केले. उर्वरित सदोष मीटर्स व नव्याने आढळून आलेले सदोष मीटर्स तातडीने बदलण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत चालू आहे.

राज्यातील साखर उद्योगाचे नियोजन व नियंत्रण करणाऱ्या साखर आयुक्त कार्यालयाच्या देखभाल दुरुस्तीबाबत

(४१) १०१३९२ (२९-१२-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर उद्योगाचे नियोजन व नियंत्रण करणाऱ्या साखर आयुक्त कार्यालयाचा देखभाल दुरुस्तीच्या खर्चापोटी शेतकऱ्यांकडून प्रति टनास ५० पैशाची कपात करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२७-०८-२०१८) : (१) होय.
(२) नाही.

दरवर्षी ऊस गाळप हंगामाचे धोरण ठरविणेसाठी मंत्री समितीची बैठक घेण्यात येते. मंत्री समितीच्या दि.२०.०९.२०१७ च्या बैठकीमध्ये ऊस बीलातील कपाती व ठेवीबाबत एफआरपीची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा केल्यानंतर साखर संकुल देखभाल व दुरुस्तीकरीता प्रतिटन ५० पैसे प्रमाणे कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एफआरपीची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा झाल्यानंतर होणाऱ्या सदरच्या कपातीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य सहकारी बँकेमार्फत गावपातळीवरील प्राथमिक सहकारी विकास सेवा संस्थांना थेट पतपुरवठा करण्याबाबत.

(४२) १०१४१० (०६-०१-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी बँकेने गावपातळीवरील प्राथमिक सहकारी विकास सेवा संस्थांना थेट पतपुरवठा करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अभ्यास करण्यासाठी सचिव, सहकार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीच्या शिफारशी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत काय,
(४) असल्यास, उक्त शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१८-०८-२०१८) : (१) होय.

दिनांक ३१/०७/२०१७ च्या प्रशासकीय मंडळ-कार्यकारी समितीच्या सभेत अर्थक्षम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना राज्य बँकेमार्फत थेट कर्ज पुरवठा करण्याबाबतचे धोरण संमत केले आहे.

(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महावितरणच्या थकबाकीदार वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत

(४३) १०४८७२ (०४-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या थकबाकीदार वीज ग्राहकांना पूर्वकल्पना अथवा सूचना न देता वीज पुरवठा खंडीत केल्यास संबधित अधिका-यावर न्यायालयीन कारवाई तसेच नोकरीवरुन काढून टाकण्यात येणार असल्याचा निर्णय राज्य वीज नियामक आयोगाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी कशाप्रकारे व केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्‌यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०८-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील राष्ट्रीय सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून मिळालेला शासकीय मदतीचा धनादेश न वटल्याबाबत

(४४) १०५१७८ (०४-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील गौतम नगर मधील व्यक्तीचा दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास वीजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून २० हजार रुपयांचा धनादेश दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तहसिलदाराच्या स्वाक्षरी कार्यक्रम घेऊन संबंधितांना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा धनादेश संबंधित महिलेने तीन वेळा स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये वटविण्यासाठी टाकला असता संबंधित खात्यावर पुरेसे पैसेच शिल्लक नसल्याने उक्त धनादेश न वटल्यामुळे बँकेने संबंधित महिलेस दंड आकारला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर महिलेला आर्थिक मदत देण्याबाबत तसेच धनादेश न वटल्या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३०-०८-२०१८) : (१) श्रीमती सपना इंगळे यांना राष्ट्रीय सामाजिक अर्थसहाय्य योजनेतंर्गत रु.२०,०००/- चा धनादेश देण्यात आला.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) श्रीमती सपना इंगळे यांना दिलेला धनादेश संगणकीय प्रणालीतील चुकीमुळे न वटता परत आला आहे. परंतु तहसिल कार्यालय, यवतमाळ यांचेकडून श्रीमती इंगळे यांना देय असलेल्या रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरिता अप्पर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असता, चौकशीमध्ये तहसिल कार्यालयाची कोणतीही चूक नसल्याचे आढळून आले. सबब, कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्यात आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईतील घणसोली परिसरात वीजेची समस्या दूर करण्याकरिता स्वतंत्र सब स्टेशन उभारण्याबाबत

(४५) १०५३७० (०४-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील घणसोली, घणसोली गाव, तळवली गाव, गोठवली गाव, राबाडा गाव या परिसरात वारंवार वीज खंडित होत असल्याने विजेची समस्या दूर करण्यासाठी स्वतंत्र सब स्टेशन उभारण्याची आवश्यकता असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जून, २०१७ मध्ये मा. ऊर्जा मंत्री व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे माहे जानेवारी २०१८ मध्ये लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर परिसरात स्वतंत्र सब स्टेशन कधी पर्यंत सुरू होणे अपेक्षित आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०१८) : (१) यासंबंधीची निवेदन महवितरणच्या स्थानिक क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली आहेत.

(२) व (३) घणसोली परिसरात स्वतंत्र उपकेंद्र उभारण्याबाबत लागणाऱ्या जागेची मागणी महावितरण कंपनीमार्फत सिडको कार्यालयास करण्यात आलेली आहे. सिडकोकडून जागा प्राप्त झाल्यानंतर नवीन उपकेंद्र प्रस्तावित करण्यात येईल.

उमरेड (जि. नागपूर) तालुक्यातील खादी ग्रामोद्योग महामंडळांतर्गत कंबल उत्पादन केंद्र बंद असल्याबाबत

(४६) १०६०१७ (०४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील खादी ग्रामोद्योग महामंडळांतर्गत उमरेड येथील बसस्थानकाच्या शेजारी असलेले कंबल उत्पादन केंद्र सन २००५ पासून बंद आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय?

(३) असल्यास, सदर कंबल उत्पादन केंद्र सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२९-०८-२०१८) : (१), (२) व (३) सतत होणाऱ्या तोट्यामुळे उमरेड येथील बस स्थानकाच्या शेजारी असलेले कंबल उत्पादन केंद्र सन २००५ पासून बंद करण्याबाबत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या दिनांक २६.०६.२००२ रोजीच्या सभेत ठराव क्रमांक ३ पारीत करण्यात आला त्यामुळे सदर केंद्र बंद आहे.

सदर केंद्र हे अप्रचलित झाले असून तेथील यंत्रसामुग्री ही अत्यंत खराब व दुरुस्ती ना करता येण्यासारखी झाली आहे.

(४) सदर केंद्र आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याने सततच्या तोट्यामुळे व निधी अभावी बंद आहे. सदर केंद्र हे आज सुस्थितीत नाही. परंतु मंडळाकडून अनेक लघुउद्योगांसाठी राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमध्ये महाखादी ब्रँड नावाखाली सर्व लघुउद्योजकांची उत्पादने संपूर्ण राज्यात विक्री करणे व त्यासाठी विक्री केंद्रे उभारण्याची खादी मंडळाची संकल्पना आहे. याव्यतिरिक्त कापूस उत्पादन क्षेत्रामध्ये ग्रीन फॅब नावाखाली सोलर चरख्यावर कापड उत्पादन करण्यासाठी उत्पादन केंद्र सुरु करण्याचे खादी मंडळाकडून प्रस्तावित आहे.

साखरखेर्डा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील जिल्हा को.ऑप. बँकेच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना कर्ज वाटप केल्याबाबत

(४७) १०६६७८ (०४-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेर्डा (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील जिल्हा को.ऑप. बॅकेच्या अधिकाऱ्यांनी कर्ज वसूलीच्या नावाखाली ६७५ शेतकऱ्यांचे नव्याने कर्जाचे पुनर्गठन करुन त्यांना नवीन कर्ज वाटप केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे सर्व कर्जदार कर्जमाफीच्या निकषात बसल्यानंतर त्यांच्या नावे सदर कर्ज कायम राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१८-०८-२०१८) : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यात दुष्काळ असल्याने शेतकऱ्यांची वीज खंडीत न करण्याबाबत केलेली मागणी

(४८) १०७२३९ (०४-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यासह अहमदनगर जिल्हयात गत चार वर्षापासून दुष्काळी परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांचा विद्‌युत पुरवठा खंडीत करण्यात येवू नये अशी मागणी विद्‌युत मंडळाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) कृषी ग्राहकांना थकबाकीची मूळ रक्कम सुलभ हप्त्याने भरण्याकरिता "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना -२०१७" दिनांक ३१.१०.२०१७ पासून सुरु करण्यात आली होती. ज्यामध्ये थकबाकीची मूळ रक्कम ५ सुलभ हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा उपलब्ध असून शेवटचा हप्ता भरण्याचा कालावधी मार्च, २०१९ पर्यंत वाढविण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात राष्ट्रीय कुटूंब लाभ योजनेअंतर्गतच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत

(४९) १०९११३ (०४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम

शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय कुटूंब लाभ योजनेअंतर्गत एकरकमी २० हजार रक्कम आदेश दिनांक १२ मार्च, २०१३ रोजी निर्गमीत केले असून सदर रक्कमेत सन २०१३ ते २०१७ या कालावधीत वाढ झालेली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या रकमेमध्ये रुपये एक लाखापर्यंत वाढ करण्यास शासन विचाराधीन आहे काय

(३) असल्यास, शासनाने सदर बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१८) : (१), (२) व (३) राष्ट्रीय कुटूंब लाभ योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेमध्ये रु.१०,०००/- वरुन रु.२०,०००/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे.

सदर योजना केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने केंद्र शासनाकडून सदर योजनेतील रक्कम वाढविल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने बाजारपेठेतील बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या कामांकडे दुर्लक्ष केल्याबाबत

(५०) १११०१८ (२०-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने बाजारपेठेतील बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या कामांकडे दुर्लक्ष केल्याने अधिक्षक अभियंत्यासह वरिष्ठ स्वच्छता निरीक्षकावर निलंबनाची कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिकची चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०४-१०-२०१८) : (१) व (२) होय. हे खरे आहे.

सदरची बाब बाजार समितीच्या अभियांत्रिकी विभाग (बांधकाम विभाग) तसेच स्वच्छता विभागाशी निगडीत असल्यामुळे संबंधीत विभागाने सदर कामामध्ये दुर्लक्ष केल्यामुळे अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख म्हणून अधिक्षक अभियंता तसेच विकास टप्पा-२ मार्केट-२ (धान्य बाजार) येथे सदर कालावधीत कार्यरत असलेले वरीष्ठ स्वच्छता निरीक्षक यांना प्रथमदर्शनी जबाबदार धरून त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली व दि. ४.१.२०१८ रोजीच्या पत्रानुसार आरोपपत्र देऊन संबंधितांची खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली.

अधिक्षक अभियंता यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करण्याकरीता सहकार विभागातील निवृत्त विशेष निबंधक तथा माजी पणन संचालक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून चौकशीचे कामकाज सुरू आहे.

तसेच वरीष्ठ स्वच्छता निरीक्षक यांच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करण्याकरीता सहकार विभागातील उपनिबंधक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येऊन, चौकशी अहवालातील शिफारशीनुसार वरीष्ठ स्वच्छता निरीक्षक यांचेवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवानियमातील तरतूदीनुसार ताकीद देऊन त्यांचे सेवापुस्तकात नोंद घेण्यात आली आहे आणि त्यांना दि.२०.४.२०१८ पासून कामावर हजर करून घेण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.